MAH/MUL/ 03051/201

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ™

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचालित व मुंबई विद्यापीठ, मुंबई संलग्नित

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी, ता. शहापूर जि. ठाणे

व इंडियन कौन्सिल अँन्ड सोशल सायन्स रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राष्टीय चर्चा सत्र

# जागतिकारणाचा भारतीय आदिवासी समुदायावर पडलेला प्रभाव

**Patron**

**Hon. Ravindra Ghodvinde**

(President Of Jeevandeep Shaikshanik Sanstha)

Guest Editor

**Prof K R Kalkate**

HOD of Marathi Department & I/ C Principal

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal.shahapur Dist. Thane

**Prof D M Bhutale**

HOD of Sociology Department

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal. shahapur Dist. Thane

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

14) जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील आदिवासिंची स्थिती
प्रा. जोगदंड बी. एस., गेवराई ||58

15) जागतिकीकरणाची संकल्पना
प्रा. रुपाली कांबळे, मुंबई ||60

16) आदिवासी : लोकसंस्कृती व साहित्य परंपरा
श्री. एल. डी. उमवणे, किन्हवली ||65

17) जागतिकीकरणाचे महाराष्ट्रातील आदिवासी अर्थव्यवस्थेवरील परिणाम
प्रा. लक्ष्मी पडवळ, ठाणें ||69

18) आंध आदिवासींचा समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा.डॉ. वेदप्रकाश अविनाश मलवाडे, & प्रा.नवगणकर आर.व्ही., सेनगाव ||72

19) जागतिकीकरणाचा भारतीय आदिवासी शिक्षणावर परिणाम
निहारिका देशमुख, ठाणे ||75

20) आदिवासी युवकांच्यावरील जागतिकीकरणाचा प्रभाव: एक समाजशास्त्रीय अभ्यास
श्री. पी . डी. पाटील, सांगली ||79

21) जगतिकीकरण आणि आदिवासी कविता
प्रा. विनोद चंद्रकांत पाटील, शिवळे ||83

22) जागतिकीकरणाचा कातकरी समाज जीवनावर झालेला परिणाम
प्रा. चिंतामण भोईर, ता. कल्याण ||87

23) जागतिकीकरण आणि मराठी आदिवासी साहित्य
प्रा. राजू शंकर शनवार, जि. ठाणे ||94

24) जागतिकीकरण : व्यापकता व व्यामिश्रता
प्रा. रामेश्वर रावसाहेब कणसे, कल्याण ||96

Scanned by CamScanner

# जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील आदिवासिंची स्थिती

**प्रा. जोगदंड बी. एस.**
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
र.भ अट्टल महाविद्यालय गेवराई

*************

**प्रस्तावना :-**

भारतातील विविधता हिच भारताची एकता समजली जाते. ज्या प्रमाणे भारतामध्ये प्रादेशिक विविधता, भाषीक विविधता, भौगोलिक विविधता, सांस्कृतीत विविधता आढळून येते. त्याच प्रमाणे भारतामध्ये सामाजिक विविधता देखील पहावयास मिळते. हि सामाजीक विविधता धार्मीक आधारावर, जातिय आधारवर, ही आढळते. तसेच एखाद्या जातिय समुहाचे सामाजीक स्थान काय आहे यावरुन विविधता आढळून येते.

भारतात अस्तित्वात असलेल्या जाति पैकी काही जाति ह्या आदिवासी जाती म्हणून ओळखल्या जातात. त्यांनाच भूमीपुत्र, मुलनिवासी म्हणुन ओळखले जाते. भारतातील आदिवासीचे एकुण लोकसंख्येपैकी प्रमाण २०११ च्या जनगणनेनुसार ८.६ % एवढे आहे. तर महाराष्ट्रातील आदिवासीचे प्रमाण एकुण लोकसंख्येपैकी ९.३५ % एवढे आहे. आदिवासी समाजाला भारतीय राज्यघटनेमध्ये अनुसुचित जमाती म्हटले आहे.

आदिवासी म्हणजे कोण किंवा आदिवासी कोणाला म्हणावे हे स्पष्ट करण्यासाठी आदिवासी समाजाचे अभ्यासक, संशोधक, मानववंश शास्त्रज्ञ यांनी आदिवासी समाजाच्या व्याख्या करुन आदिवासी म्हणजे कोण हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**आदिवासी समाजाच्या व्याख्या :-**

**१) शिलॉंग आदिवासी परिषद (१९६२) :-** एकसमान भाषेचा वापर करणाऱ्या, एका पुर्वजापासुन उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भुप्रदेशात वास्तव्य करणा-या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागसलेला, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकिय रिती रिवाजा प्रमाणे प्रामाणिक पालन करणाज्या एकजिन्सी गटाला आदिवासी समाज म्हणतात.

डोंगरावरव जंगलात राहाणारे ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवनपध्दतीचा परिचय होवू शकला नाही अशांचा समावेश आहे."

३) "A human community developed by an association of and interbreeding between a number of families, opposed in principle to crossbreeding with other communities and preserving in own customs beliefs and organization."

वरील व्याख्यांच्या आभ्यासा वरुन हे स्पष्ट सांगता येते की आदिवासी म्हणजे ज्या लोकांची एक विशिष्ट भाषा, संस्कृती सामाजिक व आर्थिक व्यवस्था परंपरा असते, तसेच जे एकाच ठिकाणी राहातात. आणि राज्यघटनेमध्ये ज्यांना अनुसुचित जमाती म्हटलेले आहे, अशा लोकांना आदिवासी असे म्हणतात.

**महाराष्ट्रातील आदिवासी :-**

महाराष्ट्र हे भारतातील पुरोगामी विचारधरेचे एक प्रगतीशील राज्य म्हणुन ओळखले जाते. महाराष्ट्रातील एकुण लोकसंख्ये चा विचार केला असता आदिवासी किंवा अनुसुचति जमातीची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या जवळपास ९ % एवढी आहे. महाराष्ट्रात गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, नाशिक, ठाणे, पालघर, नागपूर, नंदुरबार इ. जिल्ह्यांनमध्ये आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे असलेले आढळते. विविध जनगणनेनुसार आदिवासीचे महाराष्ट्रातील लोकसंख्येचे प्रमाण पुढील प्रमाणे :-

| जनगणना वर्ष | राज्याची लोकसंख्या लाखात | आदिवासी लोकसंख्या लाखात | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२ |
| १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ |
| १९९१ | ७८९.३७ | ७३०१८ | ९.२७ |
| २००१ | ९६८.७९ | ८५.७७ | ८.८५ |
| २०११ | ११२३.७४ | १०५.१० | ९.३५ |

Source :- Census Reports

वरील आकडेवारी वरुन असे स्पष्ट होते की महाराष्ट्रातील अनुसुचित जमातीची लोकसंख्या वाढाची प्रवृत्ती कमी अधिक प्रमाणात सातत्याने १९७१ चे दशक वगळता ९.० % ते ९.२० % एवढी रहिलेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या वाढ ९.००% पेक्षा अधिक झालेली दिसते.

आदिवासी समाजाचे महाराष्ट्राच्या लोकसंख्या प्रमाण लक्षणीय असले तरी त्यांच्यामध्ये आधुनिकीकरणाची प्रवृत्ती फारच

Scanned by CamScanner

ंद आहे. कारण सद्याच्या आधुनिक वसाहतिकरणाच्या युगातही आदिवासी समाजाचे ग्रामीण भागातील वास्तवाचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागातील आदिवासी किंवा अनुसुचित जमातींचे वास्तव्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

**Tribal Population in Rural and Urban Areas (in Percentage)**

| Sr. No | Districs | Rural | Vrban | Total |
|---|---|---|---|---|
| १) | Akola | ७.८ | २.० | ५.५ |
| २) | Amravati | १९.१ | ३४ | १४ |
| ३) | Buldhana | ५.७ | १.६ | ४.८ |
| ४) | Hingoli | १०.७ | २.१ | ९.५ |
| ५) | Nanded | ९.९ | ४.४ | ८.५ |
| ६) | Wardja | १४.३ | ५.८ | ११.५ |
| ७) | Washim | ७.१ | १.५ | ६.७ |
| ८) | Yavatmal | २१.८ | ६.७ | १८.५ |

आदिवासी समाज आजही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वास्तव्य करत असल्याने जागतिकिकरणाचे वारे त्यांच्या पर्यंत पोहलेले नाहीत. त्यांचे वास्तव्य ज्या डोंगरी प्रदेशात आहे, ज्या दुर्गम भागात आहे. ज्या जंगली प्रदेशात आहे तिथे आजही मुलभुत सुविधा पोहचल्या नाहीत. कारण आजही मोठ्या प्रमाणात साक्षरतेचा आभाव आदिवासी समाजामध्ये दिसुन येतो. शैक्षणिक सुविधा ज्या गतिने व ज्या प्रमाणात त्यांच्या पर्यंत पोहोचल्या पाहिजे होत्या. पोहचल्या नाहीत. कारण आजही निरक्षरतेचे प्रमाण आदिवासी समाजामध्ये जास्त आहे. हे पुढील आकडेवारी वरुन स्पष्ट होईल.

**Tribal population and Literacy Leveles.**

| Districs | ST Population | Litercy Percentage |
|---|---|---|
| High Literacy | | |
| Nagpur | ४७४५७१ | ७३.१६ |
| Gondiya | २१४२५३ | ७०.६४ |
| Wardha | १४४५०७ | ७०.५५ |
| Yavatmal | ५१४०५७ | ६६.१७ |
| Chandrapur | ३८९४४१ | ६५.८३ |
| Medium Literacy | | |
| Amravati | ४०४१२८ | ६४.७७ |
| Nanded | २८१९९५ | ६१.२१ |
| Hingoli | ११९५४ | ६०.९६ |
| Gadchiroli | ४१५३०६ | ५९.८३ |
| Nashik | १५६४३६९ | ५५.६८ |
| Low Literacy | | |
| Thane | १५४२४५१ | ४९.३४ |
| Raigarh | ३०५१२५ | ४९.०३ |
| Jalgoan | ६०४३६७ | ४८.९६ |
| Nandurbar | ११४९१३३ | ४६.२७ |
| Dhule | ६४७३९५ | ४२.३८ |

Source :- Census २०११ Data.

२०११ च्या जणगणनेनुसार असे दिसुन येते की विदर्भातील आदिवासी समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या भागामध्ये शहरीकरण जास्त झालेले आहे तिथेच आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण कमी दिसुन येते.

**"Percentage distribution of persons above seven years by level of education sex and location for ST in Maharashtra."** 58

| Distribution | Not Literate | Literate | Literate below primary | Primary | Middle | Secondary | Higher Secondary | Graduate and above |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Rural male | ४८.५ | ५१.४ | १८.४ | १८.८ | १५.४ | ५.३ | ४१ | १.५ |
| Rural female | ५०.० | ३८.० | १३.६ | १२.२ | ९.५ | ३.१ | ०.४ | ०.१ |
| Rural Person | ५८.१ | ४१.१ | १६.० | १५.६ | १२.५ | ३७ | १.४ | ०.८ |
| Urban Male | ११.३ | ८८.७ | १०.० | १५.३ | ३०.० | १५.० | ११.७ | १.० |
| Urban female | ४१.२ | ५८.८ | १०.६ | १५.६ | २०.० | १०.६ | ६.३ | ४.७ |
| Urban person | ३०.६ | ६९.४ | १८.१ | १५.३ | २५.१ | १३.५ | ९.१ | ७.० |

Source :- NSS ५५ th Round Report No. ४७३

वरील आकडेवारी असे दर्शवते की आदिवासी समाज जो शहरी भागातील आहे. तो ग्रामीण भागापेक्षा जास्त शिक्षित आहे. असे असले तरी आदिवासी समाजातील उच्च शिक्षणाचे प्रमाण हे नगण्यच आहे. त्यामुळे विकासाच्या प्रवाहामध्ये आदिवासी समाज आलेला नाही असेच म्हणावे लागेल.

शिक्षणाच्या समस्ये सोबतच आदिवासी समाजामध्ये कुपोषणाची समस्या ही मोठी आहे. आजही आदिवासी समाज हा अन्न-सुरक्षेच्या परिघामध्ये आलेला दिसत नाही. मुंबई सारख्या महानगराजवळील पालघर असो किंवा अमरावती शहराजवळील मेळघाट असो या ठिकाणी कुपोषणाच्या समस्येचे गंभीर स्वरुप दिसुन येते. महाराष्ट्रातील मेळघाट हा भाग देशामध्ये सर्वाधीक जास्त कुपोषणामुळे मृत्यू होणारा मानला जातो.

२०१६ साली एप्रिल ते ऑगस्ट या कालावधी मध्ये मेळघाटा मध्ये ६१४८ जणांचा मृत्यू झाला आहे. आणि एप्रिल २०१६ ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत ८८१ मातांचा मृत्यू कुपोषणाने झाला आहे. सन २०१५-१६ च्या आरोग्य सर्वेक्षण अहवाला नुसार राज्यामध्ये ८३,००० बालके जी सहा वर्षापेक्षा कमी वयाची आहेत ती कुपोषीत आढळून आली आहेत. तसेच नदुरबार जिल्हयामध्ये सन २०१५ च्या एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत ३०० बालके कुपोषणग्रस्त आढळली. आदिवासी समाजामध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे कारण महाराष्ट्रातील जवळपास ६१ % आदिवासी समाज हा दारिद्रयरेषेखाली

Scanned by CamScanner

आपल जावन जगतआह. त्या साबतच आदिवासी समाजामध्ये स्थलांतरणाची समस्या ही आहे कारण रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी त्यांना आपले मुळ ठिकाण सोडावे लागत आहे. तसेच दुष्काळी परिस्थिती मुळे ही शेती करणे अशक्य होत असल्याने हाताला काम मिळत नसल्याने आपल्या उदरनिर्वाहासाठी शहरी भागाकडे स्थलांतरण होत आहे.

सारांश रुपाने असे सांगता येईल की जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आपले स्थान निश्चित करण्यासाठी आदिवासी समाजाला आणखी संघर्ष करवा लागणार आहे. शैक्षणिक स्थिती, कुपोषणाची समस्या सुधारणे, रोजगाराची साधणे निर्माण करणे, आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१. नाडगोडे गुरुनाथ : भारतीय आदिवासी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे -३०

२. स.मा गर्ग : भारतीय समाज विज्ञान कोशखंड -१, संचालक, समाजविज्ञान मंडळ, शिवाजीनगर, पुणे - ७

३. Editors onuld O Bolander : The New Lexicom, Webters dictionary of the English Language, Alyce Bolander sarq A Book atc. Lexion publication, New York.

४. Census - २०११

५. cbps. in

६. Financial Express २१ September २०१६

७. Down to Earth ०४ July २०१५

८. NSS Reports

९. Center for Budget and policy studies, Bangalore June २०१७

१०. Shodhganga infllbnet.ac.in


❑❑❑

**15**

# जागतिकीकरणाची संकल्पना


**प्रा. रुपाली कांबळे**
मुंबई


**प्रास्ताविक :**

कोणताही समाज आपणास स्थैर्य प्राप्त व्हावे यासाठी प्रयत्नशील असतो. तथापी कोणताही समाज कधीच पूर्णत: स्थिर नसतो. त्यामध्ये सतत परिवर्तन होत असते. समाजातील संस्था, संघटना, नियमने, मूल्ये, आचारविचार इत्यादीमध्ये बदल होत असतात व या बदलांमुळे समाजाच्या संरचनेतही बदल होत असतात. समाजाच्या संरचनेत होणाऱ्या बदलास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. मानव समाजात बदल घडवून आणणाऱ्या विविध प्रक्रिया सतत सुरु असतात. औद्योगिक क्रांतीनंतर समाजात औद्योगिकीकरण, पाश्चिमात्यकरण, आधुनिकीकरण अशा अनेक प्रक्रिया सुरु झाल्या. या प्रक्रियांचा प्रभाव पडून समाजात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. जागतिकीकरण ही देखील अशीच एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे जगातील सर्व समाजात अनेक लक्षणीय व महत्त्वपूर्ण बदल घडून येण्यास चालना मिळाली आहे.

**जागतिकीकरण संकल्पना :**

जागतिकीकरण ही सद्य:कालीन प्रक्रिया असून ती जगभर सुरु आहे. औद्योगिकीकरण, पाश्चिमात्यकरण व आधुनिकीकरण या प्रक्रियांचा विस्तारीत असा पुढचा टप्पा म्हणजे जागतिकीकरण आहे. १९८० नंतर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात आर्थिक सुधारणेचे वा पुनर्रचनेचे जे कार्यक्रम सुरु झाले, त्यातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. जागतिकीकरण ही संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणारी किंवा जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेस आर्थिक पैलूबरोबरच राजकीय,


Scanned by CamScanner